# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2019-20)/13/ of 2019**

**परिपत्रक:**

विषय:– **कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून URI-The Surgical Strike चित्रपटाचे मोफत प्रक्षेपण करण्याबाबत.**

संदर्भ:– **सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई** यांचे क्र. सहसं/अशि/मुंवि/URI/२०१९/१६५४, दिनांक २४ जुलै, २०१९.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना **सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई** यांचे पत्र क्र. सहसं/अशि/मुंवि/URI/२०१९/१६५४, दिनांक २४ जुलै, २०१९ रोजीचे आदेशान्वये कळविण्यात येते की, २६ जुलै हा भारतीय सैन्यासाठी शौर्याचा दिवस. या दिवशी कारगिल युध्दात भारताने आपल्या विजयाचा ध्वज फडकावला होता. हाच दिवस देशभरात **''कारगिल विजय दिवस''** म्हणून साजरा केला जातो.

राज्यातील युवकांमध्ये देशाच्या सैन्याबद्दल कर्तव्य भावना आणि अभिमान वाढावा याकरिता माजी सैनिक कल्याण विभागाने ना. ना. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या **२६ जुलै, २०१९ सकाळी १०.०० वाजता URI-The Surgical Strike** या चित्रपटाचे मोफत प्रक्षेपण करण्याचे योजिले आहे. या सिनेमाचे मोफत प्रक्षेपण करण्यामागचा मुख्य उद्देश हा १८ ते २५ वयोगटातील युवकांनी या सिनेमाद्वारे प्रेरित व्हावे असा आहे.

तरी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयामध्ये दिनांक २४/०७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या मौखिक सुचनेनूसार आपल्या महाविद्यालयातील १८ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांना नजिकच्या सिनेमागृहामध्ये **URI-The Surgical Strike** हा सिनेमा पाहण्यासाठी पाठविण्यात यावे. सोबत माहाविद्यालयाचे ओळखपत्र ठेवण्याबाबात आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना सुचना देण्यात यावे. आपल्या महाविद्यालयाचा एक प्रतिनिधी सदर सिनेमागृहामध्ये पाठविण्यात यावा. उपरोक्त विषयी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

Jjadhav

(जयदत्त जाधव)
सहाय्यक कुलसचिव
संलग्नता विभाग

मुंबई–४०० ०३२
२५ जुलै, २०१९

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना:–**

१. कुलगूरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२.
२. स्वीय सहाय्यक, प्र–कुलगूरू (प्र), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२.
३. स्वीय सहाय्यक, प्र–कुलसचिव (प्र), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२.
४. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, ३, महापालिका मार्ग, मुंबई– ४०० ००१.